RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ३२(२)] शुक्रवार, मार्च १, २०२४/फाल्गुन ११, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ०१ मार्च, २०२४.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्रमांक मजनिप्रा- २०२३/(२४/२३)/जसं(आस्था).—महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ३ च्या पोट-कलम (५) तसेच कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार दिनांक १२ ऑगस्ट, २००५ च्या जलसंपदा विभागाची अधिसूचना क्रमांक मजनिप्रा. निवड २००५/७८/०५ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम १ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे जलसंपदा अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य म्हणून श्री. राजेंद्र दत्ताजीराव मोहिते यांची नियुक्ती करीत आहेत. ही नियुक्ती त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दीपक कपूर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.



दि 06/03/2024 रोजी कार्यभार स्विकारले